# MT - 162

**Seat No.** | | | | | | | |

2019 ___ ___ 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM - I - PAPER - II**

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Marks : 100**

**विभाग – १ : गद्य**

**पठित गद्य**

उ.१ (अ) **खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **आकृतिबंध पूर्ण करा.** १

**लेखकाच्या उपोषणाविषयी कानांवर येणारी वाक्ये**
- माझी 'नाही ती भानगड' आहे.
- उगीच 'हात दाखवून अवलक्षण' आहे
- 'पेललं नाही तेव्हा खाजगी झालं।'

(ii) **एका वाक्यात उत्तर लिहा.** १

पंत पूर्वीसारखे गाढ झोपत नाहीत यावर त्यांच्या धर्मपत्नीचा अजिबात विश्वास नव्हता.

(२) (i) **कोण कोणास म्हणाले ते लिहा.** १

**''दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा !''**
- **कोण** → पंत
- **कोणास** → स्वत:शी

(ii) **चूक की बरोबर ते लिहा.** १

चाळीतल्या लोकांनी पंतांच्या उपासाची अवहेलना केली. - बरोबर

(३) व्याकरण :

(i) **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांतील अव्यय ओळखून प्रकार लिहा.** १

अव्यय - वर प्रकार - शब्दयोगी अव्यय

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** १

(अ) दु:ख - आनंद (आ) अविश्वास - विश्वास

(४) **स्वमत :** २

पंतांनी उपोषण केल्याची खाजगी हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येताजाता 'नाही ती भानगड आहे', 'उगीच हात दाखवून अवलक्षण' आहे, 'पेललं नाही तेव्हा खाजगी झालं!' अशी वाक्ये त्यांच्या कानावर पडू लागली. पंतांना मात्र रात्रंदिवस 'एकशे एक्क्याऐंशी पौंड' वजनाचे कार्ड डोळ्यांपुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहिजे या विचाराने त्यांची झोप उडाली. झोप कमी झाल्यामुळे वजन कमी होते या विचाराने त्यांना त्याचे काही वाटत नव्हते. पण यावर पत्नीचे दुरुत्तर होते की ''घोरत तर असता रात्रभर!'' एकूण काय वजन कमी झाले पाहिजे या विचाराने पंतांनी ''दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!'' अशी भीष्मप्रतिज्ञा केली.

उ.१ **(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** १

निरंजनने क्षणभर विचार केला आणि **स्टेशनच्या दिशेने धाव घेतली**.

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** १

**तीन-चार** किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती.

(२) (i) **आकृतिबंध पूर्ण करा.** १

**धाड्धाड् आवाज करणारी रेल्वेगाडी डोळ्यांसमोर दिसल्याने निरंजन विसरला**

- नागरिकशास्त्राचा पेपर
- देशमुखांकडचं जेवण

(ii) **एका वाक्यात उत्तर लिहा** १

निरंजनने आर्जवं केले की निदान जागा पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका.

(३) **व्याकरण**

**तक्ता पूर्ण करा.** २

| अ.क्र | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती प्रकार |
|---|---|---|---|
| (i) | मिनिटांत | त | सप्तमी (अनेकवचन) |
| (ii) | पोलिसांच्या | च्या | षष्ठी (अनेकवचन) |

**(४) स्वमत** २

आपल्याला काय वाटते यापेक्षा जे वाटते ते विधायक काम केले पाहिजे. गरिबांना मदत करावीशी वाटते. अंधांना सहारा द्यावासा वाटतो; पण वाटण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करणे त्यापेक्षा श्रेष्ठ आहे. आईला, आजीला, कामात मदत करणे, आजोबांची पिशवी उचलणे, बागकाम करून झाडांना पाणी घालणे इ. कितीतरी लहानमोठी कामे करण्यासारखी असतात. ती केली की मनाला समाधान मिळते म्हणून नुसतीच भावना मनात बाळगून अर्थ नाही तर कृती करणे महत्वाचे आहे. भावनेपेक्षा कृती केव्हाही श्रेष्ठच!

**अपठित गद्य**

उ.१ **(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) २

**विद्वत्तेची वैशिष्ट्ये**

- ती क्षणात मिळवता येत नाही.
- जेवढ्या प्रयत्नाने मिळवाल तेवढे प्रभावी व्यक्तिमत्त्व.
- वेळेच्या सदुपयोगाने मिळणारी.
- मिळण्यासाठी धनसंपत्ती खर्ची घालावी लागत नाही.

**(२) खालील घटनेचा किंवा कृतीचा परिणाम लिहा.** २

| अ.क्र | घटना/कृती | परिणाम |
|---|---|---|
| (i) | झाडाची मुळे खोल जाणे | तेवढा पाया भक्कम |
| (ii) | प्रयत्नांनी विद्या मिळवणे | तेवढे प्रभावी व्यक्तिमत्त्व |

**(३) व्याकरण**

**खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** २

(i) संपूर्ण - विशेषण
तुमच्या - सर्वनाम

(ii) सारखे - शब्दयोगी अव्यय
की - उभायन्वयी अव्यय

**(४) स्वमत** २

विद्या म्हणजेच ज्ञान. ज्याला ज्ञान प्राप्त होते त्याला समाजातील सर्व सुखे प्राप्त होतात.समाजात त्या व्यक्तीला मान, सन्मान, प्रतिष्ठा, प्रसिद्धी प्राप्त होते. एक प्रकारची वैचारिक कुवत त्याच्यात येते. ज्ञानाने सत्य-असत्य मधला फरक कळतो. नवीन आदर्शांची जाणीव होते. नीतीमूल्यांची जपणूक कशी करावी ते कळते. देश हितार्थ गोष्टी कळू लागतात. देशप्रेम वाढीस लागते. बंधुभाव, राष्ट्रप्रेम वाढीस लागते. त्याला हव्या असणाऱ्या ठिकाणी काम करण्याची संधी मिळते. योग्य निर्णय क्षमता येते. त्याच्या व्यक्तिमत्त्वात भर पडते. चार-चौघात त्याचे विचार प्रकर्षाने तो मांडू शकतो. आपल्या ज्ञानाचा उपयोग तो इतरांसाठीही करतो.

## विभाग – २ : पद्य

उ.२ **(अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) आकृतिबंध पूर्ण करा.** १




**(ii) खाली दिलेल्या अर्थाची ओळ कवितेतून शोधून लिहा.** १

मातीमध्ये जे हात राबती, तयास देऊ पुष्टी

**(२) (i) चौकट पूर्ण करा.** १

जिथे दृष्टी पोचते तेथे असतात - फुलांचे ताटवे

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** १

आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी <u>तुष्टी.</u>

**(३) पुढील काव्यपंक्तीचा अर्थ स्पष्ट करा.** २

आभाळातून होणाऱ्या पावसाच्या वृष्टीमुळे डोंगरातून खळाळत पाणी वाहत येईल. डोंगर दऱ्यातून वाहणारे धबधबे व त्यातून फेसाप्रमाणे उधळणाऱ्या पांढऱ्या तुषारांना पाहिल्यावर आपण आपली सारी दु:खे विसरून जावून निसर्गाच्या सान्निध्यात खऱ्या अर्थाने आनंदून जावू. खळाळत्या पाण्याला पाहून आपल्याही मनात हास्याचे तुषार उधळले जातील व आपली सारी दु:खे राहणारच नाही किंबहुना त्यांना पाहिल्यावर कसे राहू आपण कष्टी ? असा प्रश्न कवयित्री आपल्याला विचारते आहे.

(४) वसुंधरा ही हिरव्यागार शालूत शोभून दिसते. हिरवाईचा, शेतांचा, रानांचा व गवताच्या विविध हिरव्या छटा निसर्ग खुलवतात. वसुंधरेचे हिरवेपण जपण्यासाठी खालील उपाय करता येतील. २

i) 'झाडे लावा, झाडे जगवा' या प्रतिज्ञेने सर्वांनीच 'एक व्यक्ती, एक झाड' असे प्रमाण ठेवले तर वसुंधरा हिरवीगार होईल.

ii) फळांच्या बिया मोकळ्या जागेत, डोंगरावर उधळाव्या.

iii) बागबगीचे, रानांकरिता अधिकृत जमीन राखावी व तेथे रोपे लावावी.

iv) जमिनीचा कस कमी व नष्ट करणाऱ्या वस्तू वापरू नये. उदा. प्लॅस्टीक, थर्मोकोल, अतिप्रमाणात वापरात असेलेली कीटकनाशके.

v) जागोजागी पाण्याचे साठे तयार करावेत, ज्यामुळे पावसाळ्याव्यतिरिक्तही झाडांना पाणी मिळेल. वसुंधरेच्या हिरवेपणावर आपले अस्तित्व टिकून आहे. याची जागृती प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण झाली पाहिजे.

उ.२ **(आ) 'हिरवंगार झाडासारखं' व 'दोन दिवस' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.**

**(i) हिरवंगार झाडासारखं**

**(१) कवी/कवयित्री : –** १

जॉर्ज लोपीस

**(२) कवितेचा रचनाप्रकार : –** १

'हिरवंगार झाडासारखं' या कवितेचा रचनाप्रकार 'मुक्तछंद' हा आहे.

**(३) कवितेचा काव्यसंग्रह : –** १

'हिरवंगार झाडासारखं' ही कविता 'पूर्ण झाले आहे' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

**(४) कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –** १

'हिरवंगार झाडासारखं' या कवितेतून 'शम (शांती)' हा स्थायी भाव दिसून येतो.

**(५) कवितेतील आवडलेली ओळ : –** २

पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं

**(६) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –** २

कवी जॉर्ज लोपीस यांची 'हिरवंगार झाडासारखं' ही कविता मला खूप आवडली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे 'जीवन जगण्याची कला शिकवणारे झाड हा या कवितेचा गाभा आहे. झाडांचे मानवी जीवनातील स्थान अतुलनीय आहे. झाडे हा मानवी जीवनाचा 'श्वास' च आहेत. जॉर्ज

लोपीस यांनी प्रत्येक ओळीत झाडाचा जगण्याशी संबंध जोडला आहे. झाडे आनंदी जीवनाचा आदर्शच आपल्यासमोर ठेवतात. कवितेत ठिकठिकाणी उदाहरणे देऊन कवीने ते मांडले आहे. कवितेतील प्रत्येक ओळीतून झाडाविषयी आपुलकीची, कृतज्ञतेची भावना मनात निर्माण होते. मनातील नैराश्य दूर करणारी व आशावादाची ज्योत पेटवणारी मन हिरवंगार करणारी ही कविता खरोखरच मनापर्यंत पोहोचते.

**(ii)** **दोन दिवस**

(१) **कवी/कवयित्री : –** १
नारायण सुर्वे

(२) **कवितेचा रचनाप्रकार : –** १
दोन दिवस' या कवितेचा रचनाप्रकार 'मुक्तछंद' हा आहे.

(३) **कवितेचा काव्यसंग्रह : –** १
'दोन दिवस' ही कविता 'ऐसा गा मी ब्रह्म!' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

(४) **कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –** १
'दोन दिवस' या कवितेतून 'दु:ख' हा स्थायी भाव दिसून येतो.

(५) **कवितेतील आवडलेली ओळ : –** २
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

(६) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –** २
कवी नारायण सुर्वे यांची 'दोन दिवस' ही कविता मला खूप आवडली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे भाकरीचा चंद्र शोधण्यात ज्यांची जिंदगी बरबाद होते त्या सगळ्या कष्टकरी, कामगार, श्रमिक, गरीब लोकांचा सोशिकपणा, त्यांचा संयम, त्यांचे दु:ख कवीने सहजपणे वाचकांसमोर मांडले आहे. कवीने वेदनेचा भाव कोणत्याही प्रकारची चीड, संताप किंवा आक्रस्ताळेपणाने न मांडता अत्यंत संयमी आणि सुयोग्य प्रतिकांचा वापर करून मांडले आहे. सर्वस्व असलेले हात, माना उंचावलेले हात, कलम झालेले हात यांसारखी प्रतिके मनाला अंतर्मुख करून जातात. त्यामुळेच ही कविता मनाला भिडते.

उ.२ (इ) **खालील ओळींचे रसग्रहण करा.** ४

'अंकिला मी दास तुझा' या अभंगात संत नामदेवांनी विविध दृष्टान्तांतून परमेश्वर कृपेची याचना केली आहे.

एखादे पक्षिणीचे पिलू घरट्यातून अचानक खाली जमिनीवर पडावे. ते खाली पडलेले दिसताच त्या पिलाची माता पक्षिणी त्यास पुन्हा घरट्यात ठेवण्यासाठी अगदी तत्परतेने झेप घेते किंवा गाईचे

भूकेलेले वासरू पाहून त्या वासराची आई गाय आपल्या बाळासाठी हंबरत त्याकडे धाव घेते. त्याप्रमाणे हे परमेश्वरा तू माझ्या प्रत्येक कार्यात धाव घे, असे संत नामदेव म्हणतात.

वरील ओळीतून संत नामदेव समर्पक उदाहरणांनी आपली भावना अभंगाच्या माध्यमातून आपणासमोर मांडत आहेत. मातृप्रेमाची उत्कटता वरील ओळींतून व्यक्त होताना दिसते. नामदेवांच्या वरील ओळीतून आंतरिक आर्तता दिसून येते. आपल्या नित्याच्या जीवनातील उदाहरणांनी नामदेवांनी साध्या, समर्पक भाषेच्या रचनेतून आपला करूण रस व्यक्त केला आहे.

## विभाग – ३ : स्थूलवाचन

उ.३ **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**

(१) वाचन करताना अनेक वेगवेगळे शब्द डोळ्यांखालून जातात. काही शब्द लक्ष वेधून घेतात. हे शब्द कसे तयार होत असावेत याची उत्सुकता निर्माण होते. मग अशावेळेस त्या शब्दाची निर्मिती कशी झाली हे पडताळण्यासाठी व्युत्पत्ती कोश उपयोगी पडतो. व्युत्पत्ती कोश शब्दाचे मूळ रूप दाखवतो. इतकेच नव्हे तर त्यातील विस्तार संदर्भ, उच्चारातील बदल व फरक दाखवतो. याची उत्पत्ती पाहणे, उच्चार जाणून घेणे ही भाषासमृद्धीच्या दृष्टीने आनंददायी क्रिया आहे. एकाच शब्दाचे वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये वेगवेगळे अर्थ असतात, हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उदा. धूळ चारणे; खरे पाहता धूळ चारणे व फसवणे हे दोन अर्थ आहेत. वेगवेगळ्या संदर्भानुसार ते ते अर्थ जुळवले जातात. व्युत्पत्ती कोशातून उच्चारातील बदलांचे कारण स्पष्ट होते. अर्थातील स्पष्ट केलेला बदल अभ्यासता येतो. व्युत्पत्ती कोशातून एखाद्या शब्दाची अन्य कोणी मांडलेली व्युत्पत्ती सांगून ती योग्य व अयोग्य हे ही कळते. भाषेचे कालिक स्वरूप स्पष्ट करणे हे व्युत्पत्ती कोशाचे प्रमुख कार्य आहे. ३

(२) महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभली आहे. आधी केले, मग सांगितले या उक्तीप्रमाणे सर्व संतांनी कार्य करून दाखवले आहे. ३

उदाहरणे द्यायचीच तर संतांनी प्राण्यांवर दया करण्याचा संदेश आपल्या अभंगातून फक्त दिला नाही तर संतांनी ते करूनही दाखवले. संत नामदेव भुकेल्या कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन धावत गेले. संत एकनाथांनी भर उन्हात तडफडत असणाऱ्या गाढवाला काशीहून आणलेल्या गंगेचे पाणी पाजून समाजापुढे एक नवा आदर्श ठेवला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व थोर समाजसेवक व समाजसुधारक गाडगे महाराज यांनी स्वत: आधी हातात झाडू घेऊन गावातील केरकचरा दूर करण्यापासून ते विष्ठा उचलण्याची कामे केली. देवाच्या नावाने कर्मकांड करण्यापासून अडवले. मूर्तीपूजा न करता गोरगरीब मानवाची पूजा करा, त्यांची सेवा करा हे लोकांना आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून पटवूनही दिले.

बाबा आमटे हे ही आधुनिक काळातील राष्ट्रसंतच म्हटले पाहिजेत. रस्त्यावर महारोग होऊन पडलेल्या तुळशीरामला पाहून त्यांच्या मनात कुष्ठरोग्यांच्या बद्दल सेवाभाव जागृत झाला व त्यातूनच चंद्रपूर येथे 'आनंदवनाची' निर्मिती झाली. त्यांनी केलेल्या कामाची दखल घेत पाश्चात्य देशांनी त्यांना पुरस्कृतही केले.

या सर्व उदाहरणांवरून 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीची सार्थकता स्पष्ट झाल्यासारखे वाटते.

(३) वेगवेगळ्या ठिकाणचा सूर्यास्त वेगवेगळे सौंदर्य, वेगळे भाव, वेगळे रंग निर्माण करत असतो. माणसाची मनोदशा जशी असेल तसे भावतरंग सूर्यास्ताच्या वेळी त्याच्या मनात निर्माण होत असतात. ३

वाळवंटाच्या ठिकाणचा सूर्यास्त. वाळूच्या विस्तीर्ण पसरलेल्या अथांग भूप्रदेशावर सोनेरी मऊसार किरणे पसरवत असतो. मन अगदी तृप्त करून तो अस्ताला जातो. तेथील वाळूचा सागर हळूहळू थंड होत जातो. शितल वाऱ्याच्या झुळका वाहू लागतात. मानव, पशू, पक्षी सुखावून जातात. वाळूचा थंड स्पर्श, वाऱ्याची थंड झुळूक यामुळे मानवी मन सुखावून जाते. त्या सुवर्णमयी वातावरणात नव्या संकल्पना, जुन्या संवेदना जाग्या होतात. कवी, लेखक, चित्रकार यांना नवीन कल्पना सुचतात.

समुद्राच्या ठिकाणी अस्ताला जाणाऱ्या सूर्यास्ताचे दर्शन मोठे विलोभनीय असते. हळू हळू सागराच्या कुशीत सामावणाऱ्या सूर्याला बघून वाटते की, हा सागरात मिसळून जातो. म्हणूनच चमकदार मोती निर्माण होतात. सुंदर रंगीत प्रवाळ आणि अनंत असे जीव निर्माण होतात. समुद्राच्या लाटांसोबत हेलकावे खात हा तेजोगोल जेव्हा सागरात सामावतो तेव्हा आपोआप त्या सृष्टीकर्त्यापुढे आपण नतमस्तक होतो.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

प्र.४ **(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) समास** २

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | दीडदोन | दीड किंवा दोन | वैकल्पिक द्वंद्व समास |
| (ii) | जागोजागी | प्रत्येक जागी | अव्ययीभाव समास |

**(२) अलंकार** २

**खालील उदाहरण वाचून कृती करा.**

मुंबईची 'घरे" मात्र लहान ! कबुतराच्या खुराडयांसारखी !

| उपमेय | उपमान | साम्यवाचक | समान धर्म (गुण) |
|---|---|---|---|
| मुंबईची घरे | कबुतराची खुराडी | सारखी | लहान |

**(३) वाक्यरूपांतर** २

**कंसातील सूचनेनुसार कृती.**

(i) प्रवासात भरभरून बोला.

(ii) पांढरा रंग सर्वांना आवडतो.

(४) **सामान्यरूप** २

**खालील शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती प्रत्यय लिहून तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|
| (i) | दसऱ्याचा | दसऱ्या | चा |
| (ii) | बागेत | बागे | त |

(५) **वाक्प्रचार** २

**कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(i) ज्यांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला डाएटचा सल्ला दिला.

(ii) आजकालची मुले मोठ्या माणसांना सतत दुरुत्तरे करताना दिसतात.

उ.४ (आ) **भाषासौंदर्य**

(१) (i) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** १

(अ) जगाच्या विनाशाची अवस्था - प्रलय

(अ) महिन्याने प्रसिद्ध होणारे - मासिक

(ii) **खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** १

(अ) अलिकडे - पलिकडे (आ) विरोध - बिनविरोध

(iii) **पुढील शब्दांचे दोन भिन्न अर्थ लिहा.** १

उपवास ← व्रत → नियम

(iv) **खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. ('जडण व घडण' हे शब्द सोडून)** १

जडणघडण - घण, जड, घड

(२) **लेखननियमानुसार लेखन -**

(i) **खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** १

आकाश मेघरहित निळ्या नितळाईने नटले होते.

(ii) **अचूक शब्द ओळखून लिहा.** १

(अ) **जीवन**

(आ) **निरीक्षण**

(३) **विरामचिन्हे** २

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(i) किती सुंदर! आता ही ताई कोण बरं ?

(ii) वा! सर्व ताई-दादांनी मला किती माहिती दिली. आता हा कोणता दादा बरं ?

(४) **पारिभाषिक शब्द -**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** १

(i) Tax - कर (ii) Unit - घटक

(५) **भाषिक खेळ -** १

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.**

अननस, करवंद, जांभळं, द्राक्ष

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

उ.५ (अ) (१) **पत्रलेखन**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.** ५

दिनांक : ५ जानेवारी, २०१८.

प्रिय मैत्रिण सानिका,

सप्रेम नमस्कार,

दोन दिवसांपूर्वी तुझे पत्र मिळाले. वाचून खूप आनंद झाला. माझी काळजी करू नकोस. मी इकडे मजेत आहे. माझा अभ्यास व्यवस्थित चालू आहे. घरचेही सुखरुप आहेत.

काल आपल्या शाळेच्या सूचनाफलकावरील मुख्याध्यापकांचे निवेदन वाचले. कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान, महाड यांच्यातर्फे आयोजित चित्रकला स्पर्धेत जिल्हा स्तरावर तुझा प्रथम क्रमांक आल्याचे समजले. खूप आनंद झाला. तुझे मनापासून अभिनंदन !

तू नेहमी अनेक चित्रकला स्पर्धांमध्ये भाग घेत असतेस, त्यात तू पहिलीच असायचीस, याही स्पर्धेत तू प्रथम क्रमांक मिळवलास 'मैत्रीण'' म्हणून तुझा खूप अभिमान वाटतो. यापुढेही तू असेच यश संपादन करावे व आपल्या शारदा विद्यालयाचे नाव रोशन करावे, अशी अपेक्षा करते. तुला भावी वाटचालीसाठी खूप साऱ्या शुभेच्छा!

काका व काकूंना नमस्कार. छोट्या राजूला गोड पापा.

कळावे, लोभ असावा.

तुझी मैत्रीण,
अ.ब.क.
मातृसदन,
मु.पो. आंबिवली,
ता. महाड, जि. रायगड.

**(२) सारांश लेखन** ५

**विभाग -१ गद्य विभागातील प्र १ मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या श्ब्दांत लिहा.**

विद्वत्ता क्षणात मिळवता येत नाही. झाडासारखा विद्वत्तेचा पायाही भक्कम असतो. विद्वत्ता मिळवण्यासाठी पैसा खर्च करावा लागत नाही. वेळेच्या सदुपयोगाने मिळणारी विद्वत्ता आपल्याकडून कोणी हिरावून घेऊ शकत नाही. विद्वत्ता प्राप्त झाल्यानंतर अहंकार गळून पडतो. मनातील मानसन्मान ही भावना निघून जाते. शिवाय इतर सर्वजण आपले आदरातिथ्य करण्यासाठी आतूर असतात.

उ.५ **(आ) खालील कृती सोडवा.**

**(१) बातमी लेखन** ६

**वार्ताहाराकडून** **दिनांक: १६ ऑक्टोबर, २०१७**

**वाचन प्रेरणा दिन**

रामनगर ता. १५ ऑक्टोबर रोजी-मराठी ग्रंथ संग्रहालय व वाचनालयातर्फे रामनगर येथे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचना प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून ग्रंथालयाने अनेक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात सुप्रसिद्ध लेखक श्री. जयवंत लेले यांच्या हस्ते देवी सरस्वती व डॉ. अब्दुल कलाम यांच्या फोटोंना पुष्पहार घालून करण्यात आली.

त्यावेळी विद्यार्थ्यांसाठी व प्रौढांसाठी उत्कृष्ट वाचक वाचन स्पर्धा घेण्यात आली. यात स्पर्धकांनी कथा, कविता व लेखांचे वाचन केले. या स्पर्धेत कु. शरद पोळ या विद्यार्थ्यांस व श्री गजानन वामन शेलार यांस उत्तम व उत्कृष्ट वाचक म्हणून प्रथम पारितोषिक देण्यात वाचनाचे महत्त्व कळावे व वाचन संस्कृतीचा विकास व्हावा म्हणून ग्रंथालय प्रयत्न करणार असल्याचे ग्रंथालयाच्या अध्यक्षांनी सांगितले. प्रमुख पाहुण्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजकांचे व सहभागी आणि विजेत्या स्पर्धकांचे कौतुक केले. एक हजार पुस्तके आपण ग्रंथालयाला देणगी देणार असल्याचेही घोषित केले. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**(२) कथालेखन (८० ते १०० शब्द)** ६

**परतफेड**

फार प्राचीन काळातील कथा आहे ही. अवंतिका नगरीच्या उत्तरेला ५ मैलांवर घनदाट जंगल होते. या जंगलात सारे प्राणी, पशुपक्षी गुण्यागोविंदाने नांदत होते. जंगलाचा राजा सिंह ऐटीत इकडून तिकडे, तिकडून इकडे असा भटकत असे. तो खूप दयाळू व प्रेमळ होता. पोट भरलेले असताना उगाचच तो कुणाची शिकार करत नसे.

एके दिवशी दुपारचे जेवण झाल्यावर सिंह एका झाडाखाली सावलीत थोडा वेळ आरामात पहुडला होता. त्याचवेळी त्या झाडाच्या सावलीत आपल्या मित्रांबरोबर काही उंदीर पकडापकडी खेळत होते. त्यातला एक छोटा उंदीर झोपलेल्या सिंहाच्या अंगावर उड्या मारू लागला. त्यामुळे सिंहाची चांगलीच झोपमोड झाली. त्याने डोळे किलकिले करून पाहिले तर छोटासा उंदीर! त्याने

हळूच आपला पंजा पुढे केला आणि पटकन त्या उंदराला पकडले.

''आता तुला मी खाऊन टाकणार", सिंह गरजला. प्रचंड घाबरलेला तो उंदीर म्हणाला, ''म ........ म........ महाराज माफी असावी. मी चुकलो. मला माफ करा."

''नाही, तू माझी झोपमोड केलीस. मी तुला जिवंत सोडणार नाही."" सिंहाने उत्तर दिले.

''महाराज, माझ्यावर उपकार करा. मी कधीतरी नक्कीच तुमची मदत करीन." घाबरलेला उंदीर पटकन बोलला. यावर सिंह जोरजोरात हसू लागला. पण त्याला उंदराची दया आली. हा छोटासा उंदीर आपल्याला काय मदत करणार ? असा विचार करतच सिंहाने त्याला सोडून दिले आणि पुन्हा तो झोपला.

दुसऱ्याच दिवशी झुडुपात लावलेल्या शिकाऱ्याच्या जाळ्याकडे सिंहाचे लक्षच गेले नाही. लपून बसण्यासाठी तो तेथे गेला आणि अलगद जाळ्यामध्ये अडकला. त्याने सुटका करून घेण्यासाठी खूप धडपड केली, पण व्यर्थ! तो आणखीनच त्या जाळ्यामध्ये अडकला. शेवटी तो सिंह ओरडू लागला. त्याचे ते ओरडणे त्या छोट्या उंदराने ऐकले आणि धावतच तो तेथे पोहोचला. आपल्याला जीवनदान देणारा सिंह आता शिकाऱ्याकडून पकडला जाणार हे पाहताच तो मदतीसाठी धावला. त्याने आपल्या दातांनी भराभर ते जाळे कुरतडायला सुरूवात केली. पाच ते सात मिनिटात त्याने ते जाळे तोडून सिंहाला मुक्त केले. त्या छोट्याशा उंदराची ती मदत पाहून सिंहाच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

उ.५ (इ) **लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.(शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

(१) **प्रसंगलेखन** ८

**अब्दुलचा सत्कार समारंभ**

**दिव्यत्वाची जेथ प्रचिती। तेथे कर माझे जुळती ।।**

'अब्दुलला ओळखणाऱ्या प्रत्येकाला त्याच्याबद्दल एक आदराची व आपुलकीची भावना वाटते. खरं तर, या विभागात तो'चुडीवाला' म्हणूनच अधिक प्रसिद्ध आहे. समाजातील अनेक प्रकारच्या भेदभावामुळे आपण आपले वैरी झालो आहोत. कुटुंबाच्या मर्यादित आपल्या सुखदु:खाचे विश्व फारच मर्यादित झाले आहे. पण या मर्यादा ओलांडून समाजसेवेचे व्रत घेतलेली काही माणसे असतात. त्यापैकी एक होता अब्दुलमियाँ. त्या दिवशी ते आमच्या घरी आले ते सत्काराचे निमंत्रण देण्यास. मी नक्की उपस्थित राहाण्याचे आश्वासन त्यांना दिले.

मी व माझी ताई वेळेवर कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचलो होतो. ज्येष्ठ समाजसेवा मंडळातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या मंडळातर्फे समाजातील दहा श्रेष्ठ समाजसेवकांचा सत्कार होणार होता. एक अब्दुलमियाँही होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी नेहमीप्रमाणेच आवाज, गडबड, गोंधळ होता. व्यासपिठावर एक भलामोठा फलक लावण्यात आला होता. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे व सत्कारमूर्ती उपस्थित होते. स्वागत पद्य, ईशस्तवन, पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे उद्दिष्ट सांगून मुख्य कार्यक्रम सुरु झाला.

मला जाणून घ्यावयाचे होते की, अब्दुलमियाँने कोणती मोठी समाजसेवा केली म्हणून आज त्यांचा सत्कार व गौरव केला जाणार आहे. प्रत्येक सत्कारमूर्तीला मनोगतही व्यक्त करायचे होते. कार्यक्रम

खरोखर चांगला होता. समाजसेवेच्या रुपाने समाजऋण व माणुसकीचे दर्शन घडविणाऱ्याच्या कार्याचे कौतुक करून इतरांना समाजसेवेची प्रेरणा देणे हाच मुख्य उद्देश होता.

अब्दुलमियाँच्या नावाची घोषणा झाली. मी कान टवकारले. त्यांच्याविषयी काय सांगतात हे मला ऐकावयाचे होते.

परिचयकर्ता सांगू लागला - 'अब्दुलमियाँ" ज्यांना आपण 'चुडीवाला" या नावानेही ओळखतो. ते एका गरीब कुटुंबात जन्मले. सात भावंडात ते सर्वात लहान. शिक्षण झालेच नाही कारण गरिबी. बांगड्या विकणे हाच व्यवसाय. हातावरच पोटाचा भार. पण दादासाहेब पटवर्धन यांच्या सहवासाने त्यांनी समाजसेवा सुरु केली. कुष्ठरोगी महिलांना बांगड्या भरण्यास कोणताही बांगडीवाला तयार नव्हता. आम्हांला तुमचे पैसे व संपर्कही नको म्हणून बांगडीवाले कुष्ठरोगी महिलांना टाळत होते. पण अब्दुलमियाँनी मात्र स्वत:हून इथे येण्याचे व माय-भगिनींना मोफत बांगड्या भरण्याचे कार्य आजतागायत सुरू ठेवले आहे. या त्यांच्या कार्यामुळे कुष्ठरोगी महिलांच्या जीवनात आनंदाचा वर्षाव ते करतात. तसेच नगरपालिकेच्या 'बालक-माता आरोग्य योजने' च्या कार्यक्रमातही ते सहभागी होतात. ते सुद्धा कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता. त्यांचे हेच समाजकार्य व मानवसेवा अनमोल आहे. म्हणून ही संस्था त्यांचा सत्कार व गौरव करीत आहे. या कार्यात त्यांच्या कुटुंबियांचीही त्यांना मोलाची साथ मिळते. अब्दुलमियाँनी केवळ 'धन्यवाद' एवढे शब्द उच्चारून अभिवादन केले.

असा हा अनोखा, आगळा वेगळा सत्कार सोहळा मी अनुभवला जो अत्यंत प्रेरणादायी आहे.

(२) **आत्मकथन** ८

**फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त**

'मी एक फाटके पुस्तक बोलतोय. अडगळीच्या कोपऱ्यात धूळ खात पडलेलं, प्रत्येक पानाची शिवण उसवून मुखपृष्ठासह फाटलेलं. तुम्हा माणसांची तऱ्हाच न्यारी आहे. आपलं काम झालं की, त्या वस्तूला दूर सारता. आजचं युग संगणकाचं आणि ई-मेलचं युग आहे. हल्ली तर काय म्हणे तुम्ही पुस्तकंसुद्धा संगणकावरच वाचता. हा झाला आजचा काळ, पण तो काळ मी कसा विसरू. त्यावेळेस गदिमा, कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, बालकवी, वि.स.खांडेकर यांच्यासारख्या दिग्गज लेखकांच्या शब्दांचा साज आमच्या अंगावर चढायचा. अंगावर मोरपिस फिरावं तसं वाचकाचं बोट माझ्या पानापानावरून फिरत असे.'

'अगदी ज्ञानोबा माऊलीपासून ते काल परवाच्या तुमच्या चंद्रशेखर गोखल्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आमचाच आधार घेतला. तुमच्या जीवनाच्या प्रत्येक जडणघडणीत आम्हीच मोलाचा वाटा उचलला. एक काळ असा होता की, साहित्य विश्वाचे दूत म्हणून आम्ही जगभर अभिमानाने मिरवलो. इंग्रजांच्या काळातसुद्धा तुरूंगातील मान्यवरांचे विचार तुरूंगाबाहेर आम्हीच पोहोचवले.'

'मन दु:खी किंवा अस्वस्थ झाल्यास आमचीच साथ धरली जात होती. त्याकाळी खरंच साहित्याची गंगा घरोघरी वाहत होती. दर्जेदार लेखकांबरोबर जाणकार वाचकही त्याकाळी असायचे आणि आमच्यासारख्या पुस्तकावरसुद्धा 'परिसंवाद' घडायचे. तत्वज्ञानाचा आधार घेऊन मनाला स्थैर्य आणण्याचा प्रयत्न व्हायचा. विनोदाची शाल पांघरून वाचक मनोमन हसायचा. सामाजिक, राजकीय, क्रीडा इ. सर्व क्षेत्रात आमची मुशाफिरी होती. पुस्तक बाजारात येण्याआधी नोंदणी होण्याइतपत आमची दादागिरी होती. दिवाळी अंकावर वाचकांच्या उड्या पडायच्या. जेव्हा विविध संकटे वाट्याला

यायची तेव्हा स्वत:ला सावरण्यासाठी वाचकांची पावले नकळत आमच्याकडे वळायची. घरात बसल्या बसल्या आम्ही तुम्हाला परदेश सफर घडवून आणायचो. भरकटलेल्या तरूणांना योग्य दिशासुद्धा आम्हीच दाखवायचो. आयुष्याच्या प्रत्येक चढउतारावर, प्रत्येक वळणावर आम्हीच तुमचे मार्गदर्शक होतो.'

'माझ्या पानांचे कित्येक कोपरे आजही दुमडलेले आहेत. तुम्ही वाचता वाचता इथे थांबला होतात, हे तुम्हाला सांगण्यासाठी. उराशी मी आजही तो सुकलेला गुलाब जपून ठेवलाय. कुणालातरी, कुणाची तरी आठवण म्हणून दिलेला. भले तुम्ही आम्हाला अडगळीचा कोपरा दाखवला असेल, पण या जीर्ण अवस्थेतही माझ्याकडे आहे बरेच काही तुम्हाला देण्यासारखे.'

काल परवा तो टी.व्ही. काय आला आणि तुम्ही आम्हाला विसरलात. घरभर पुस्तकांचे रकाने अभिमानाने सजवणारे तुम्ही, अचानक आमच्यापासून दूर गेलात. काय तर म्हणे, पुस्तक वाचण्यात वेळ जातो, कंटाळा येतो. तुमचं वाचनच कमी झालंय, तुमचे शब्दसामर्थ्य कमी पडते. दोन-तीन मराठी शब्दांनंतर इंग्रजीचा आधार घ्यावा लागतो. तुम्ही जर पुस्तके वाचत असता तर निश्चितच तुमच्याकडेही अमाप शब्दसंपत्ती असती आणि शब्दांची वानवा भासली नसती.'

'मी आता फारच थकलोय. जीर्ण झालेल्या पानांसकट माझी कधी होळी होईल, हे सांगता येत नाही. परंतु तुम्हा सर्वांना सांगून जातो, 'वाचाल तर वाचाल". पुस्तक संस्कृती पुन्हा येऊ द्या, आमच्यासारख्या अडगळीत पडलेल्या फाटक्या पुस्तकांना पुन्हा सुगीचे दिवस पाहू द्या.''

❖❖❖❖❖